MHKO120005112012

-

# नियमीत दिवाणी दावा क्र.१५८/२०१२ मधील

## नि. ८९ वरील आदेश

(शोभा वि. मंगल)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. २ ने जादाचे मुद्दे काढणेत यावेत याकरिता दिला आहे.

२. प्रस्तुतचा दावा वादीने कब्जा मिळणेकरिता, नुकसान भरपाई हक्कज्ञापन व निरंतर ताकीदीकरिता न्यायालयापुढे दाखल आहे.

३. प्रस्तुतच्या अर्जामध्ये प्रतिवादी क्र. २ ने असे कथन केले आहे की, वादीने दावा कब्जा मिळणेकरिता नुकसान भरपाईकरिता व हक्कज्ञापन होवून मिळणेकरिता व निरंतर ताकीदीकरिता दाखल केला आहे. प्रतिवादींनी त्यांची कैफियत नि. १६ ला दिली आहे व मुद्दे नि. २२ वर काढले आहेत. प्रकरण अंतिम युक्तीवादाला लागले आहे. प्रतिवादीने कैफियत मध्ये जी कथने मांडली आहेत त्याअनुषंगाने खालील तीन मुद्दे काढणेत यावेत.

अ) वादी दाव्यास कारण घडल्याचे सिद्ध करतात काय ?

ब) दावा मिळकतीचे मूल्य योग्य केले आहे का ?

क) दाव्याला estoppel च्या तत्वाची बाधा येते का ?

४. वादीने नि. ९२ अन्वये सविस्तर म्हणणे दिले.वादीने असे कथन केले की, वादींनी कोणत्याही नोंदणीकृत खरेदी पत्राने प्रतिवादींना दावा मिळकत खरेदी दिलेली नाही. तसेच, estoppel च्या तत्वाची बाधा येत नाही व अर्ज लबाडीने दिला

आहे त्यामुळे, ५०००/- ची कॉस्ट लावून अर्ज मंजूर करावा, कारण, प्रकरण १० वर्षांपेक्षा जास्त जुने आहे. कैफियत परिच्छेद ९ मध्ये न्यायालयीन शुल्क योग्य नोंदविले नाही, अशी हरकत प्रतिवादींनी घेतली आहे व दाव्यास कारण घडलेले नाही अशीही हरकत प्रतिवादींनी घेतलेली आहे. दावा अंतिम युक्तीवादावर आला आहे व उदाहणार्थ सांगायचे झालेस दाव्यातील कथने वादींनी सिद्ध केली नाहीत तर दावा फेटाळला जाईल व त्यामुळे दाव्यास कारण घडले की नाही यासाठी स्वतंत्र मुद्दा काढण्याची आवश्यकता नाही, परंतु, दाव्यातील व कैफियतीमधील कथने पाहता उर्वरित दोन मुद्दे काढणे आवश्यक वाटते, तसेच, दावा मुदतीत आहे का नाही हा देखील मुद्दा काढणे जरुरीचे वाटते. सबब, मी खालील आदेश पारीत करतो.

| आदेश | |
|---|---|
| १) | अर्ज अंशतः मंजूर केला जातो. |
| २) | दावा मिळकतीचे मूल्य योग्य केले आहे का व दाव्याला estoppel च्या तत्वाची बाधा येते का व दावा मुदतीत आहे का असे जादाचे मुद्दे अ. क्र. ४ ते ७ प्रमाणे काढणेत येतात. |
| | **(खुल्या न्यायालयात जाहीर )** |

NISHANT DIPAK RUDRABHATE
Digitally signed by NISHANT DIPAK RUDRABHATE
Date: 2025.07.25 10:16:41 +0530

**गारगोटी.** **(नि. दि. रुद्रभटे)**

दिनांक- २४/०७/२०२५ दिवाणी न्यायाधीश क.स्तर

**गारगोटी.**